# पनवेल महानगरपालिका

*ता.पनवेल, जि.रायगड*

**कार्यालय** :- आयुक्त मुख्यालय, २ रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१० २०६ दूरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२
Email Id : panvelcorporation@gmail.com

**जा.क्र.पमपा/मुख्यालय/१२७३/२०२०** **दिनांक :- १३/०४/२०२०**

**वाचले :-**

१. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्र. करोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य-०५/, दिनांक १४/०३/२०२०
२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र. करोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य-०५/, दिनांक १४/०३/२०२०
३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४.
४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६.
५. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
६. महाराष्ट्र कोव्हिड -१९ उपाययोजना नियम, २०२०.

## आदेश

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणू(कोविड-१९) रोखण्यासाठी राज्यात साथ रोग अधिनियम कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० रोजी लागू केला आहे. त्याबाबत उपोद्घातील क्रमांक ०१ मधील अधिसूचना लागू करण्यात आली आहे.

ज्याअर्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना विषाणूचे संसर्ग बाधित रुग्ण आढळून येत आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत विमान प्रवास केलेले अनेक प्रवासी विविध भागांत आलेले आहेत. असे काही प्रवासी पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये आलेले आहेत. त्यामुळे कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचा संसर्ग असलेल्यात अधिक वाढ होऊ न देता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशा प्रवाशांमुळे कोरोना विषाणू संसर्ग पनवेल महानगरपालिका क्षेत्रात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गर्दीची ठिकाणे जाणे, वास्तव्य करणे इत्यादी बाबी टाळणे आवश्यक आहे.

त्याअर्थी कोरोना विषाणू (कोविड-१९) रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ लागू करून त्यातील खंड ०२, ०३ व ०४ मधील अधिसूचना निर्गमित केल्या आहेत. रायगड जिल्ह्यातील पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पनवेल शहर येथील निकी टॉवर, विश्राळी नाका, सी. विंग येथे ०१ व्यक्ती कोरोना विषाणू बाधित आढळून आल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे पनवेल